# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र. ४४४ दिनांक १५/०५/२०२०

## वालीव पोलीस ठाणेचे कडुन तंबाखुजन्य अन्न पदार्थ ताब्यात बाळगणा-या आरोपीतावर कारवाई करुन १५,१२,४००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

दि. १४/०५/२०२० रोजी ०३.३० वाजता वालीव पोलीस ठाणेचे हद्दीतील सुपर मार्केटच्या मागे, धानिवबाग तलावाचे जवळ, धानिवबाग, नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर येथे यातील आरोपीत अबुसालेम अब्दुलहई खान वय २३ वर्षे धंदा-ड्रायव्हर,रा. रुम नं.२०६,साई प्लाझा बिल्डींग, डिसेन्ट हॉटेल समोर,डोंगरी फलीया,वापी,राज्य-गुजरात याने महाराष्ट्र शासनाने तंबाखुजन्य अन्न पदार्थासंबंधात जारी केलेल्या प्रतिबंधीत आदेशाची अवज्ञा करुन तसेच माननीय जिल्हाधिकारी सो, यांचे नमुद मनाई आदेशाचा भंग केला. तसेच मानवी जिवीतास धोकादायक असलेला कोरोना रोगाचा ससंर्ग पसरविण्याचा संभव असताना हयगयीची घातकी कृती करुन अपायकारक खादय पदार्थाची विक्री करण्याचे उद्देशाने वरील वर्णनाचा व किमतीचा माल आपले कब्जात बाळगला असतांना मिळुन आला. आरोपीत याचे ताब्यातुन १) ४,४८,८००/-रुपये किंमतीच्या एकुण- १२ खाकी रंगाच्या बारदाणाच्या गोण्या त्यातील प्रत्येक गोणीमध्ये १८७ रुपये किमतीचे २०० पॅकेट त्यावर विमल पान मसाला लिहिलेले. २) २४,०००/- रुपये किंमतीची १ खाकी रंगाची बारदाणाची गोणीमध्ये १२० रुपये किमतीचे २०० पॅकेट त्यावर विमल पान मसाला लिहिलेले. ३)३९,६००/-रुपये किंमतीच्या एकुण ०४ सफेद रंगाच्या प्लास्टिकच्या गोण्या त्यातील प्रत्येक गोणीमध्ये ३३ रुपये किमतीचे ३०० पॅकेट त्यावर वि-१ तंबाखु असे लिहिलेले. ४)१०,००,०००/- रुपये किमतीचा एक टाटा कंपनीचा १२१२ सी.आर.एक्स. मॉडेल असलेला टेम्पो क्रमांक एम.एच.४८बी.एम.३२२७ असा एकुण १५,१२,४००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत याचे विरुध्द वालीव पोलीस ठाणे गु.र.नं. I ५२५/२०२० भा.दं.वि.सं.क. ३२८, २६९, २७०, २७३, १८८ सह अन्न सुरक्षा मानदे अधिनियम कलम २६(२),४, ३०(२)(ए) व आपत्ती व्यवस्थापन अधीनीयम २००५ मधील कलम ५१(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विलास चौगुले, वालीव पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078

Address-sp office Bidco Road,Palghar west

E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ४४० दिनांक १४/०५/२०२०

## वालीव पोलीस ठाणेचे कडुन विनापरवाना विदेशी दारु वाहतुक करणा-या ४ आरोपीतांवर कारवाई करुन ८,१२,७२०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

दिनांक १३/०५/२०२० रोजी १३.०० वाचे सुमारास रेंजनाका वसई पुर्व ता.वसई जि.पालघर, आरोपीत गणेश पंढरिनाथ घाडगावकर वय - ४० वर्षे, रा. ठाणे पश्चिम यांनी त्याचे ताब्यातील विदेशी दारु अवैध रीत्या आपल्या कब्ज्यात बाळगुन विनापरवाना वाहतुक करीत असतांना मिळुन आला.आरोपीत याचे ताब्यातुन १) ६,७२० /-रु. एक पुठ्याचा कारटुन बॉक्स त्यात इंपिरीयल ब्ल्यु कंपनीच्या ७५० एम.एल.च्या ५६०/- रुपये दराच्या एकुण १२ बाटल्या २)४,००,०००/- रुपये किंमतीची सिल्वर रंगाची फोर्ड कार असा एकुण ४,०६,७२०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत याचे विरुध्द वालीव पोलीस ठाणे गु.र.नं. ।।। ५२३/२०२० मुंबई प्रो.ॲक्ट कायदा कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच दिनांक १३/०५/२०२० रोजी १२.०० वाचे सुमारास रेंजनाका वसई पुर्व ता. वसई जि. पालघर आरोपीत १) गौरव शशिकांत पगारे वय २८ वर्षे, रा. मुलूंड प. मुंबई २) गिरीराज दिनेश पाटील वय -३१ वर्षे, रा.मुलूंड प. मुंबई ३) हितेश रतन जाधव वय २८ वर्षे, रा. मुलूंड प. मुंबई यांनी त्याचे ताब्यातील कार मध्ये विदेशी दारु अवैध रीत्या आपल्या कब्ज्यात बाळगुन विनापरवाना वाहतुक करीत असतांना मिळुन आले आरोपीत यांचे ताब्यातुन १) ६००० /-रु. दोन पुठ्याचा कारटुन बॉक्स त्यात बुम बिरा सुपर स्ट्रॉंग बियरच्या ५०० एम.एल.च्या १२५/- रुपये दराच्या एकुण ४८ पत्री टिन २)४,००,०००/- रुपये किंमतीची ब्राऊन रंगाची डस्टर कार असा एकुण ४,०६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्या आला असुन आरोपीत यांचे विरुध्द वालीव पोलीस ठाणे गु.र.नं. ।।। ५२२/२०२० मुंबई प्रो.ॲक्ट कायदा कलम ६५(ई) प्रमाणे

सदरची कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विलास चौगुले, वालीव पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ४४१ दिनांक १४/०५/२०२०

## विरार पोलीस ठाणेचे कडुन विनापरवाना देशी-विदेशी दारु वाहतुक करणा-या ५ आरोपीतांवर कारवाई करुन १,८६,०५२/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

दि. १३/०५/२०२० रोजी १६.१५ वा चे सुमारास विरार पोलीस ठाणे हद्दीतील एम.बी इस्टेट, विरार पश्चिम येथे आरोपीत १) सुरेंद्र राजाराम काटारीया वय ४० वर्षे रा- गोरेगाव पुर्व २) जॉनी अरलॅन्डो फर्नाडीस वय ३० वर्षे रा- गोरेगाव पुर्व ३) राजेंद्र सुभय्या अर्जन वय ५० वर्षे रा- गोरेगाव पुर्व यांनी त्याचेकडे कोणताही परवाना नसताना देशी व विदेशी कंपनीची दारु माल त्याचे ताब्यातील होन्डा कंपनीची गाडी क्र एम.एच.०२ बीपी ५५७० मध्ये बेकायदेशिर रित्या विक्री करण्यासाठी जवळ बाळगुण वाहतुक करीत असताना मिळुन आला. आरापीत यांचे ताब्यातुन १) एस.पी ब्लॅक कंपनीची १८० मीलीच्या ४८ बाटल्या, प्रत्येक बॉटल १४०/- रु किमतीची २) १३२०/- रु किमतीची एल.पी.स्टॉग कंपनीची ५०० मीली चे पत-याचे कॅन प्रत्येकी किंमत ११०/- रु किमतीची ३) १३००/- रु किमतीची जी.एम संत्रा कंपनीची देशी दारुच्या बाटल्या प्रत्येकी किंमत ५२/- रु किमतीची ४) १,५०,०००/- रु कि ची होन्डा कंपनीची गाडी क्र एम.एच.०२ बीपी ५५७० असा एकुण १,५९,३४०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत यांचे विरुध्द विरार पोलीस ठाणे गु.र.नं. III ५२९/२०२० महाराष्ट्र दारु कायदा कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच दिनांक १३/०५/२०२० रोजी १५.३० वाजता साईबाबा मंदिराचे समोर, वीर सावरकर मार्ग, विरार पूर्व, ता.वसई जि.पालघर आरोपीत १) नरेंद्र हरिषचंद्र आगरकर वय ४६ वर्षे, धंदा-व्यवसाय, रा. घाटकोपर पूर्व, मुबंई २) कैलास रघुनाथ आवारे वय ४० वर्षे, रा. घाटकोपर पुर्व, मुबंई यांनी प्रोव्हिबिशन गुन्हयाचा माल बेकायदेशीरपणे आपले कब्जात बाळगुन वाहतुक करुन नेत असतांना मिळुन आले आरोपीत यांचे ताब्यातुन १) ६,७२०/- रु. रुपये किमतीची रॉयल स्टॅग कंपनीची ३६० मिलीच्या एकुण ४८ बॉटल्स २) ४,९९२/- रु. किमतीची जी.एम कंपनीची १८० मिलीच्या एकुण ९६ बॉटल्स प्रत्येकी बॉटल ५२ रुपये किंमतीची ३) १५,०००/- रु. किमतीची एक लाल रंगाची बजाज कंपीनीची पल्सर मोटार सायकल असा एकुण २६,७१२/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत यांचे विरुध्द विरार पोलीस ठाणे गु.र.नं. III ५३०/२०२० महाराष्ट्र दारु कायदा कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुरेश वराडे, वालीव पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.